# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

## ऑनलाईन एम. पी. एस. सी. मुख्य (Mains) परिक्षा २०२०-२१

## प्रेस नोट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांसाठी माहे जुलै ते सप्टेंबर २०२० या दरम्यान यु टयुब चॅनलवर **"Barti Online"** व्दारे एम. पी. एस. सी. पूर्व परीक्षेचे ऑनलाइन प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले होते. या प्रशिक्षण दरम्यान एम. पी. एस. सी. पूर्व परीक्षेतील विषयांचे मार्गदर्शन देण्यात आले होते.

**दि. १८.०३.२०२१** पासून **एम. पी. एस. सी. मुख्य (Mains)** परिक्षेसाठी ऑनलाईन मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले आहे. सदर मार्गदर्शन वर्गामध्ये एम. पी. एस. सी. मुख्य परीक्षेस आवश्यक उर्वरित अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन दिले जाईल. तरी इच्छूक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया बार्टी, पुणे च्या www.barti.in या संकेतस्थळावर नोटीस बोर्ड तसेच **ई- बार्टी ॲपमधील M- governance** अंतर्गत मध्ये **ऑनलाईन " एम. पी. एस. सी. मुख्य (Mains) परीक्षा ऑनलाईन कोचिंगसाठी प्रवेश अर्ज "** या लिंकवर उपलब्ध आहे.

सदर प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ४ महिन्यांचा (माहे जुलै २०२१ पर्यत) असेल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी कमी किंवा अधिक करण्यात येईल. मार्गदर्शन वर्ग सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ४ या वेळेत आयोजित केले जातील. तसेच शनिवार, रविवार व शासकिय सुटयांच्या दिवशी बंद राहतील. सदर ऑनलाईन मार्गदर्शन वर्गाचे फेसबुक पेज व बार्टीच्या **"Barti Online"** या यु टयुब चॅनल वरुन लाईव्ह-स्ट्रिमिंग करण्यात येत आहे.

**मा. महासंचालक यांच्या मान्यतेने**

प्राध्यापक तथा उपायुक्त
**प्रशिक्षण विभाग**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**